प्रेसनोट दि.२२.०१.२०२०

शिर्षक :- श्री. आनंद विनायक कोरे, वय ३५ वर्षे, रोजगार हमी सेवक (डाटा इंट्री ऑपरेटर), तहसिलदार कार्यालय, कडेगांव यांना ३०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले, सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | कडेगांव पोलीस स्टेशन, गुरनं १०/२०२० |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| अरोपीचे नाव व कार्यालय | **श्री. आनंद विनायक कोरे, वय ३५ वर्षे, रोजगार हमी सेवक (डाटा इंट्री ऑपरेटर), तहसिलदार कार्यालय, कडेगांव** रा. एस.टी स्टॅन्डचे पाठीमागे, दुसरी गल्ली, नविन वसाहत, कडेगांव, ता. कडेगांव, जि. सांगली |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे वांगी गावामध्ये दिशा महा ई सेवा केंद्र नावाचे महाई सेवा केंद्र सुरु असुन केंद्रामध्ये येणा-या ग्राहकांचे शासकीय दाखले तहसिलदार कार्यालयातुन मंजुर करुन देण्याकरीता तहसील कार्यालयातीन डाटा ऑपरेटर श्री. आनंद कोरे यांनी तक्रारदार यांचेकडे दरमहा २०००/-रुपये या प्रमाणे लाच मागणी करीत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी दि. २१.०१.२०२० रोजी दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार आज दि. २१.०१.२०२० रोजी केले पडताळणीमध्ये श्री. आनंद कोरे, डाटा ऑपरेटर, तहसिलदार कार्यालय, कडेगांव यांनी तक्रारदार यांचेकडे दरमहा १०००/- प्रमाणे लाचेची मागणि करुन मागील दोन महिन्याचे व चालु महिन्याचे असे मिळुन ३०००/- रुपयांची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झालेने लागलीच तहसिलदार कार्यालय, कडेगांव येथे सापळा लावला असता श्री. आनंद कोरे, डाटा ऑपरेटर यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन ३०००/-रुपये लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले असुन श्री. आनंद विनायक कोरे, वय ३५ वर्षे, रोजगार हमी सेवक (डाटा इंट्री ऑपरेटर), तहसिलदार कार्यालय, कडेगांव यांचे विरुध्द कडेगांव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.**


संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६
संकेत स्थळ :- **acbmaharashtra.gov.in**
ई-मेल :- **acbwebmail@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार ॲप :- **acbmaharashtra.net**
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५
व्हॉट्सॲप क्रमांक :- ७३५००८७२६६, ९८२३२२५४६५

p.t.
(गुरूदत्त मोरे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली